**सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९-०००३३०-२०१८**

**नियमित दिवाणी दावा क्र. ६३/२०१८**
निलांबरी मोंडकर वि. मिनाक्षी जोशी वगैरे

**निशाणी क्र.८२ वरील आदेश.**

प्रस्ततुचा अर्ज प्रतिवादी क्र. १८ यांनी त्यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्यांची कैफियत दाखल करुन घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीने अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे.

२. प्रतिवादी क्र.१८ यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, यापुर्वी त्यांचे अन्य वकील नेमले होते. तथापि सदर वकिलांनी दि.१७/०२/२०२२ रोजी कैफियत मुदतीचा अर्ज न दिलेने प्रतिवादी क्र.१८ विरुध्द वरील तारखेला विनाकैफियत आदेश झाला होता. त्यानंतर प्रतिवादी क्र.१८ यांची प्रकृती बरी नव्हती. तसेच, कोरोना कालावधीमध्ये प्रतिवादी क्र.१८ यांना न्यायालयात हजर राहता आले नव्हते व प्रतिवादी क्र.१८ हे वृध्द गृहस्थ आहेत. प्रतिवादी क्र.१८ यांनी जाणिवपुर्वक कोणताही विलंब केलेला नाही. नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने प्रतिवादी क्र.१८ यांना त्यांच्या बचावाची संधी मिळणे गरजेचे आहे. तरी प्रतिवादी क्र.१८ विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात यावा व प्रतिवादीची कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेची विनंती त्यांनी केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

४. दाव्याचे समन्स प्राप्त झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१८ हे आपल्या वकीलांमार्फत दाव्यात हजर झाले. परंतु त्यांनी आपली कैफियत निर्धारित कालावधीमध्ये दाखल केली नाही. त्यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दि. ११/१२/२०२३ रोजी दाखल केला आहे. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, कैफियत दाखल करण्यास प्रतिवादी क्र.१८ यांना विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र.१८ यांनी अर्जात

कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाची नमूद केलेली कारणे स्वीकारार्ह नाहीत. परंतु, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रतिवादी क्र.१८ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होवून प्रकरणांची संख्या वाढून गुंता निर्माण होणार नाही. तथापि, झालेल्या विलंबाबाबत प्रस्तुत प्रतिवादी क्र.१८ वर खर्च लादणे उचित दिसते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

– आदेश –

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१८ यांनी वादीस रक्कम रु. २००/– खर्चापोटी द्यावेत. प्रतिवादी क्र.१८ यांनी खर्चाची रक्कम दिलेस प्रतिवादी क्र. १८ ची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

३. प्रतिवादी क्र.१८ यांनी आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश रद्दबातल समजणेत येईल.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.06.26 17:43:12 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिनांकः २५/०६/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.